I/0

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** एम.आई.डी.सी. सिडको **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0214 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 02/07/2020 22:38 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 02/07/2020

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 02/07/2020

**Time From (वेळेपासून):** 13:30 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 02/07/2020 **Time (वेळ):** 21:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 029 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/07/2020 22:18 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 3 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** राजर्षी शाहु इन्टीटयुट ऑफ मने,चिकलठाणा,औरंगाबाद

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** दिपक श्रीधर भराड

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | राहेगाव ,वैजापुर,औरंगाबाद,एम.आई.डी.सी. सिडको,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | राहेगाव ,वैजापुर,औरंगाबाद,एम.आई.डी.सी. सिडको,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9130676760

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 श्री जगन्नाथ खंडेराव जाधव | | | 1. अध्याक्ष लोविकास नागरी सहकरी ब, सरस्वती प्लट नं 79 एन3 सिडको, औरंगाबाद,एम.आई.डी.सी. सिडको, औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | 2 आत्माराम संताराम पवार | | | 1. रा प्लट नं 21 मारोती नगर,मयुर पार्क ,औरंगाबाद,एम.आई.डी.सी. सिडको, औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादिनांक 13.03.2020मी दिपक श्रीधर भराड वय 32 वर्ष व्यवसाय किराणा दुकाण रा राहेगाव ता वैजापुर जि औरंगाबाद मो नं 9130676760दिनांक 30/006/2020 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद कार्यालयात जावुन तक्रार दिली की, मी वरील ठिकाणी परिवारासंह राहतो. माझी राहेगाव येथे दिपक किराणा दुकाण आहे. आमची राहेगाव व अमनातपुर वाडी येथे वडोलोपार्जीत साडे तीन एकर शेती असुन वडीलांचे नावे आहे.अण्णा साहेब पाटील अर्थिक विकास महामंडाळा अंतर्गत व्यवसाय करिता कमी व्याजदराने कर्ज मिळत असल्याने मी किराणा दुकाण या व्यवसाय करिता पैश्याची गरज असल्याने, मी लोकविकास नागरी सहकारी बँक लि औरंगाबाद शाखा वैजापुर येथे जानेवारी 2020 मध्ये कर्ज मिळण्याकरिता अर्ज केला होता. सदर अर्ज देतांना आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता करुन अर्ज सादर केला होता. मे 2020 मध्ये नमुद बँक कडुन आमची शेत जमीन तारण ठेवुन माझ्या नावावर 8,00,000/- आठ लाख रुपये कर्ज मंजुर झाले आहे. मंजुर झालेले 8,00,000/- आठ लाख रुपये माझे लोकविकास नागरी सहकारी बँक लि या बँकेचे खाते क्रमाक 008002300002243 यावर दिनांक 3/6/2020 रोजी जमा झाले आहे. त्यामध्ये बकेच्या नियमानुसार बँकेने 1,00,000/- लाख रुपये एफ डी करुन घेतले. तसेच शेअर्सचे 20,100/- रुपये व ईतर चार्जेस 14,235/- रुपये बँकेने कपात केले. कर्जामधील आठ लाख रुपये पैकी वरील 1,34,335/- अशी कपात झाल्यानंतर उर्वरित रक्कम 6,66,476/- रुपये मला मिळणे अपेक्षित आहे. त्यापैकी मी दिनांक 10/6/2020 रोजी 2,00,000/- लाख रुपये वैजापुर येथील बँकेतुन काढले तसेच दिनांक 17/06/2020 रोजी मी उर्वरित रक्कम काढण्यांसाठी वैजापुर येथे बँकेत गेलो असता बँक मनेजर श्री गुळे साहेब यांनी आता मला सांगीतले की, 1,00,000/- एक लाख रुपये घ्या बाकीचे पैसे तुम्हाला देवु नका असे बँकेचे अध्यक्ष श्री जे.के. जाधव साहेब ऊर्फ दादा यांनी मला सांगीतले असुन तुम्ही जाधव साहेब यांना भेटुन घ्या ते जेव्हा मला सांगतील तेव्हा तुम्ही उर्वरित पैसे काढुन घ्या असे सांगीतले. उर्वरित पैश्याची मला आवश्यता असल्यामुळे मी ताबडतोब माझ्या मोबाईलवरुन जाधव साहेब यांच्या मोबाईल वर संपर्क करुन त्यांना सांगीतले की, मी बँकेत पैसे काढण्यासाठी आलो असता मनेजर श्री गुळे साहेब यांनी मला सांगीतले की, मला जाधव साहेबांनी तुम्हाला सध्या एक लाख पर्यंत देण्यांचे सांगीतले आहे. त्यामुळे मी तुम्हाला सध्या एक लाख रुपये पर्यंत देवु शकतो तुम्ही श्री जे के जाधव साहेबांना भेटुन घ्या श्री जे के जाधव साहेबांनी मला तुमचे पुर्ण पैसे देण्याचे सांगीतले तर मी

तुमचे पुर्ण पैसे देईल असे सांगीतले. त्यावेळी श्री जाधव साहेब यांनी मला सांगीतले की, मी तुझ्या कर्जाची फाईल मंजुर केली आहे त्यासाठी तु मला दिड लाख रुपये दे. तु मला दिड लाख रुपये दिले नाही तर तुला मंजुर झालेल्या कर्जातील अर्धी रक्कम भेटणार नाही तुझे अँकाऊंट होल्ड करण्यांत येईल असे सांगीतले. तेव्हा मी त्यांना नाईलाजाने हो म्हणुन मी तुम्हाला येवुन भेटतो म्हणुन मोबाईल कट केला व मनेजर श्री गुळे साहेब यांनी सांगीतल्याप्रमाणे 1,00,000/- लाख रुपये खात्यातुन काढुन तेथुन निघुन आलो.दिनांक 29/06/2020 रोजी मी जाधव साहेब यांना मोबाईलद्वारे संपर्क करुन भेटण्याबददल विचारले असता त्यांनी आज दिनांक 30/06/2020 रोजी भेटण्याचे सांगीतले आहे. मला श्री. जे के जाधव यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी आज रोजी लाचलुचपत प्रतिबंध विभाग, औरंगाबाद येथे त्यांचे विरोधात तक्रार देण्यासाठी आलो आहे. आज दिनांक 30/06/2020 रोजी मी श्री जे के जाधव साहेब अध्यक्ष लोकविकास नागरी सहकारी बँक लि औरंगाबाद शाखा वैजापुर यांना भेटण्यासाठी औरंगाबाद येथे ते बोलवतील त्या ठिकाणी जाणार आहे. श्री जाधव साहेब यांनी माझे लोकविकास नागरी सहकारी बँक लि औरंगाबाद शाखा वैजापुर या बँकेचे आठ लाख रुपये कर्जाची फाईल मंजुर करुन कर्जाची उर्वरित रक्कम मला देण्यासाठी माझ्याकडुन ते 1,50,000/- लाख रुपये लाचेची मागणी करणार आहे. माझा श्री जाधव साहेब यांच्यासोबत कोणतीही वैर दुश्मणी नाही तसेच पैशाचे उसनवारीचा अगर देण्या घेण्याचा व्यवहार नाही. करिता मला श्री जाधव साहेब यांनी स्वत: किंवा इतरा मार्फत लाचेची मागणी करुन स्विकारल्यानंतर त्यांना पकडुन त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी ही विनंती. अशी मजकुराची तक्रार दिली होती. त्यावरुन ला.प्र.वि. औरंगाबाद येथील पो.नि. राजपुत यांनी माझी तक्रार टंकलिखीत करुन घेतली त्यावर मी व पो.नि. श्री राजपुत यांनी सहया केल्या. त्यानंतर मला कार्यालयात हजर असलेल्या पंचाची ओळख करुन देवुन माझी तक्रार त्यांना सांगुन त्यांनी ती तक्रार वाचुन त्यावर त्यांच्या सहया केल्या. तक्रारीच्या अनुषंगाने दिंनांक 30/06/2020 रोजी लाचेच्या मागणीची पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. लाचमागणी पडताळणी दरम्यान माझी व श्री जे के जाधव ऊर्फ दादा यांची त्यांचे राहते घरी एन 3प्लट 79 सिडको हायकोर्ट जवळ भेट झाली. त्यावेळी श्री. जगन्नाथ जाधव यांनी माझे अण्णा साहेब पाटील अर्थिक विकास महामंडाळा अंतर्गत लोकविकास नागरी सहकारी बँक लि औरंगाबाद शाखा वैजापुर या बँकेकडुन आठ लाख रुपये कर्जाची फाईल मंजुर करुन कर्जाची उर्वरित रक्कम मला देण्यासाठी माझ्याकडुन तडजोडी अंती 1,25,000/- एक लाख पंचवीस हजार रुपये लाचेची मागणी केली. सदर लाचेची रक्कम बँकेतुन काढुन दिनांक 01/07/2020 घेवुन येण्याचे सांगीतले. त्यानंतर मी दिनांक 01/07/2020 रोजी बँकेतुन 1,25,000/- रुपये काढले परंतु मला उशिर झाल्याने मी श्री जाधव यांना फोन करुन मी उदया औरंगाबाद येथे येणार आहे आल्यावर आपल्याला फोन करतो व आपण सांगाल त्याठिकाणी पैसे घेवुन येतो असे सांगीतले. सदर बाब मी पोलीस निरीक्षक श्री राजपुत यांना सांगीतली. तेव्हा त्यांनी मला सकाळी 11.00 वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे हजर राहण्यास सांगीतले. पोलीस निरीक्षक श्री. संदिप राजपुत यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी दिनांक 02/07/2020 रोजी सकाळी 11.00 वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे हजर आलो. त्यानंतर मी श्री जे के जाधव यांना मोबाईलद्वारे संपर्क केला असता त्यांनी मला राजर्षी शाहु इन्टीटयुट ऑफ मनेजमेंट चिकलठाणा येथे अकाँऊट म्हणुन काम करणारे श्री पवार यांचेकडे देण्याचे सांगीतले. तेव्हा पोलीस निरिक्षक श्री. संदिप राजपुत यांचे सुचनेवरुन मी व पंच क्र. 1 प्रभाकर कस्तुरे असे आम्ही माझ्या खाजगी दुचाकी वाहनाने तर पोलीस निरिक्षक श्री. राजपुत पंच क्र. 2 श्री. घोलप व सापळा पथक हे खाजगी वाहनात बसुन राजर्षी शाहु इन्टीटयुट ऑफ मनेजमेंट चिकलठाणा जवळ काही अंतराने सुरक्षीत ठिकाणी पोहचलो. त्यानंतर पोलीस निरिक्षक श्री. राजपुत यांनी सापळा कार्यवाही संबधाने थोडक्यात सुचना देवुन ऍन्थासिन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन त्यांचे सुचनेवरुन लाचेची रक्कम 1,25,000/- रुपये माझे पन्टचे उजव्या बाजुचे खिशात ठेवले. त्यानंतर व्हाईस रेकर्डर चालु करुन माझ्याकडे दिला. रवाना करण्यापुर्वी मी श्री जे के जाधव ऊर्फ दादा यांना मोबाईलद्वारे पुन्हा संपर्क केला असता त्यांनी श्री आत्माराम पवार यांच्याकडे 1,25,000/- एक लाख पंचवीस हजार रुपये देण्याचे सांगीतले. त्यानंतर पंचासोबत रवाना केले. त्यानंतर सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी राजर्षी शाहु इन्टीटयुट ऑफ मनेजमेंट चिकलठाणा येथे माझ्या आजुबाजुला दबा धरुन थांबले. माझी व श्री. आत्माराम संताराम पवार यांची राजर्षी शाहु इन्टीटयुट ऑफ मनेजमेंट चिकलठाणा येथील त्यांचे कबीन मध्ये भेट होवुन लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर 13.30 वा. मी पुर्वनियोजीत ईशारा केला असता सापळा पथकातील अधिकारी कर्मचारी व पंच क्र. 2 असे घटनास्थळी हजर आले. पोलीस निरीक्षक श्री. राजपुत यांनी श्री. आत्माराम पवार यांना त्यांचा परिचय देवुन त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. आत्माराम संताराम पवार वय 52 वर्ष व्यवसाय नोकरी ऍ◌काउंटंट राजर्षी शाहु इन्टीटयुट ऑफ मनेजमेंट चिकलठाणा रा प्लट नं 21 मारोती नगर मयुर पार्क औरंगाबाद असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजपुत यांनी पोलीस उप अधिक्षक श्री सुजय घाटगे यांना फोन वरुन श्री जे के जाधव अध्यक्ष लोकविकास नागरी सहकारी बँक लि औरंगाबाद यांना ताब्यात घेणे बाबत कळविले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. राजपुत, स्टाफ, दोन्ही पंच, मी व श्री. आत्माराम पवार असे तिथुन निघुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे आलो. तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथील पोलीस अधिकारी यांनी श्री जगन्नाथ जाधव यांना त्यांच्या राहते घरी मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेवुन लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय येथे आणले. तेव्हा पोलीस निरीक्षक श्री राजपुत यांनी श्री जे के जाधव यांना पुर्ण नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव श्री जे के जाधव, वय-71 वर्ष, रा.एन-3 प्लट नं.79 सिडको अध्यक्ष लोकविकास नागरी सहकारी बँक लि औरंगाबाद असे सांगीतले. सदर सर्व घटनेबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला.दिनांक 30/06/2020 रोजी श्री जे के जाधव, अध्यक्ष लोकविकास नागरी सहकारी बँक लि औरंगाबाद यांनी माझे लोकविकास नागरी सहकारी बँक लि औरंगाबाद शाखा वैजापुर या बँकेचे आठ लाख रुपये कर्जाची फाईल मंजुर करुन कर्जाची उर्वरित रक्कम मला देण्यासाठी माझ्याकडुन ते 1,50,000/- लाख रुपये लाचेची मागणी करुन श्री आत्माराम पवार यांना देण्याचे सांगीतले. दिनांक 02/07/2020 रोजी 13.30 वाजेच्या श्री जगन्नाथ जाधव ऊर्फ दादा यांच्या सांगण्यावरुन श्री. आत्माराम पवार यांनी पंचासमक्ष स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे. वरील फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करुन पो.नि श्री.संदिप राजपुत लाचलुचपत प्रतिबंधग विभाग ,औरंगाबाद यांच्याकडे दिला.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): DNYANESHWAR JAGANNATH SHINDE
**Rank** (पद): HC (Head Constable)
**No.**(क्र.): 2017 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
Dipde

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Dipde

FIR प्रत मिळाली सही

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे एम.आय.डी.सी.
सिडको औरंगाबाद शहर

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची
**Name** (नाव): Vitthal Subhashrao Pote
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI